# इतर लोक लोकसभेत, त्यांची मुलं मंत्री, मलाही तोच न्याय मिळाला पाहिजे : छगन भुजबळ

प्रतिनिधी ८ जून

**मुंबई:** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेची निवडणूक जाहीर झाली आहे. या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडूनछगन भुजबळ यांना संधी दिली जाण्याची चर्चा होती. पण, भुजबळांनी अट घातली आणि पक्षाने राजेंद्र जैन यांना उमेदवारी दिली. पक्षाच्या या निर्णयानंतर छगन भुजबळ यांच्या मनातील खदखद बाहेर आली. त्यांनी पक्षातील इतर नेत्यांचा उल्लेख न करता, त्यांच्याप्रमाणेच मलाही न्याय हवा अशी शब्दात सुनावले.




छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधला. 'तुमच्यावर अन्याय झाला आहे का?' असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर बोलताना भुजबळ म्हणाले, 'अन्याय काय, हे चालायचंच आता.

आज नही तो कल, कल नही तो परसो, असे आमचे धोरण आहे. मै कबड्डी का खिलाडी हूं, शतरंज का खिलाडी नही हूं', अशा शब्दात त्यांनी मनातील घुसमट बोलून दाखवली.

राष्ट्रवादी काँग्रेसने राज्यसभेची उमेदवारी तुम्हाला का दिली नाही? या प्रश्नाला उत्तर देताना छगन भुजबळ म्हणाले, 'भाजपाकडे माझा प्रस्ताव मांडल्यानंतर निर्णय घेण्यासाठी शेवटचा दिवसच उरला होता. (समीर भुजबळ यांना राज्यात मंत्रिपद आणि स्वतःला राज्यसभा असा प्रस्ताव होता) त्यावर भाजपाकडून उत्तर आले की, राज्यात मंत्रिमंडळाचा विस्तार होईल तेव्हा समीर भुजबळ यांचा विचार करू. त्यामुळे माझा प्रस्ताव नाकारला, यामध्ये तथ्ये नाही. मी नाराजही नाही. काय नाराज व्हायचे?', असे भुजबळांनी सांगितले.

## इतरांना जो न्याय, तोच मला हवा -छगन भुजबळ

भुजबळ याच मुद्द्यावर पुढे म्हणाले की, 'इतरांना जो न्याय मिळाला (राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात); इतर लोक राज्यसभा-लोकसभेवर आहेत. इकडे त्यांची मुले मंत्री आहेत. मी पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन करण्यापासून पुढाकार घेतला आहे. त्यामुळे मला सुद्धा हाच न्याय मिळाला पाहिजे, ही माझी मागणी होती.' छगन भुजबळ यांनी पक्षातील कोणत्याही नेत्याचे नाव घेतले नाही. इतर नेते म्हणत त्यांनी त्यांची मुले मंत्री असल्याचा उल्लेख केला. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातील असे कोण नेते आहेत की, जे स्वतः राज्यसभेत आहेत आणि त्यांची मुले सध्या राज्यात मंत्री आहेत, याची चर्चा सुरू झाली आहे. कारण याच नेत्यांकडे भुजबळांचा रोख असल्याचे बोलले जात आहे.

# म्युझिक कॉन्सर्ट मध्ये तरुणाचा मृत्यू; पुण्यात 'रेव्ह पार्टी' वर छापे

प्रतिनिधी ८ जून



**मुंबई, पुणे :** गोरेगावच्या नेस्कोमध्ये अमली पदार्थांच्या सेवनाने दोन जणांचा मृत्यू घटनेनंतर विविध उपाययोजना हाती घेतल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले असले तरी अशीच आणखी एक घटना घडली. वरळी येथील 'एनएससीआय' डोममध्ये शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या 'म्यूझिक कॉन्सर्ट' मध्ये एका तरुणाचा मृत्यू झाल्याचे समोर आले. मद्याच्या अतिसेवनामुळे तो मृत पावल्याचा प्राथमिक अंदाज आहे. दुसरीकडे, पुणे शहरालगतच्या तुळापूर परिसरातील एका आलिशान फार्महाऊसवरील 'प्रोजेक्ट एक्स' या 'रेव्ह पार्टी' वर गुन्हे शाखेने रविवारी पहाटे छापा टाकला.

मद्यविक्रीच्या परवान्याची मुदत संपल्यानंतरही सुरू असलेल्या या पार्टीत मोठ्या प्रमाणात मद्यसाठा, प्रतिबंधित हुक्का आणि गांजा आढळून आला. या प्रकरणी आयोजकांसह एकूण ७८ जणांविरुद्ध लोणीकंद पोलिस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कारवाईत सुमारे ८५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. वरळी येथील कार्यक्रमात वेगवेगळ्या प्रकारची दारू प्यायल्याने एक तरुणीही अत्यव्यस्थ झाली.

राज्यात ६६ ड्रग्जविरोधात कठोर कारवाईसाठी मोहीम सुरू आहे. अमली पदार्थांची साखळी पूर्णपणे मोडून काढण्यासाठी रोज वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करण्यात येत आहे. कारवाईसाठी वेगवेगळी पथके काम करत आहेत.

'म्युझिक कॉन्सर्ट' आणि नशेचा बाजार तरुणाईसाठी मृत्यूचे दार ठरत असूनही त्यावर ठोस कारवाई, उपाययोजना करण्यात येत नसल्याने पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

वरळी येथील संगीत कार्यक्रमात तरुणीही अत्यवस्थ पुणे येथील पार्टीतील ७८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल ? पोलिसांच्या अमली पदार्थांबाबतच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

अंबरनाथ अंबरनाथ नगरपालिकेच्या कोहोजगाव येथील अग्निशमन दलाच्या मुख्य कार्यालयातच जवान मद्यपान करत असल्याचा प्रकार अग्निशमन दलप्रमुखांच्या भेटीत समोर आला. या दोन कंत्राटी जवानांना सेवेतून बडतर्फ केले आहे. अग्निशमन विभागाचे प्रमुख भागवत सोनोने हे रात्री उशिरा घरी परत असताना त्यांनी कोहोजगाव येथील अग्निशमन कार्यालयाला रात्री १२च्या दरम्यान अचानक भेट दिली. यावेळी सेवेवर असलेले तीन कर्मचारी विनागणवेश व मद्यपान करत असल्याचे आढळले. यातील दोन दोषी कंत्राटी जवानांना सोनोने यांनी तत्काळ बडतर्फ केले.

वरळी डोममध्ये शनिवारी 'स्पेस बाउंड'च्या वतीने 'क्लांगकुएन्स्टलर ऑल नाइट एल' या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी सुमारे सहा हजार प्रेक्षकांनी गर्दी केली होती. वकिलीचे शिक्षण घेतलेला, माहीम येथे राहणारा

ऋषभ गांगुर्डे (२८) हा आपल्या काही मित्रांसह या 'म्युझिक कॉन्सर्ट' मध्ये सहभागी झाला होता. या ठिकाणी उत्पादन शुल्क विभागाच्या परवानगीने दारूविक्रीही केली जात होती. रात्री साडेनऊच्या सुमारास ऋषभला अस्वस्थ वाटू लागले. त्याला जवळच असलेल्या डॉक्टरांकडे नेले. मात्र तो शुद्धीत नसल्याने त्याला रुग्णवाहिकेतून ब्रीच कँडी रुग्णालयात नेण्यात आले. येथे दाखल करण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. ऋषभ याच्या पार्थिवाचे नायर रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

धावत्या खासगी बसमध्ये करत असल्याची चित्रफीत व्हायरल झाली आहे. वातानुकूलित बसमधील या प्रकाराने काही वेळ अन्य प्रवाशांचा जीव टांगणीला होता. ही बस कोटाहून नागपूरला येत होती. धावत्या बसमध्ये खाकी पॅण्ट घातलेल्या एका प्रवाशाने सिगारेट शिलगावली आणि नंतर अमली पदार्थाचे सेवन केले. एका प्रवाशाने त्याचे चित्रीकरण केले. बस नागपुरातील गणेशपेठ भागात पोहोचल्यानंतर चित्रफीत काढणाऱ्या प्रवाशाने अन्य प्रवाशांना याबाबत माहिती दिली. अद्याप याबाबत कोणीही तक्रार केलेली नाही, असे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले.

# देशातील पहिली पॉड टॅक्सी मुंबईत

प्रतिनिधी ८ जून

**मुंबई:** वांद्रे-कुर्ला संकुलात दर शुक्रवारी साप्ताहिक 'सार्वजनिक वाहतूक दिन' पाळला जाणार आहे. या उपक्रमामागचं कारण काय? बीकेसीतील वाढती वाहतूक कोंडी. दररोज लाखो कर्मचारी लोकलने वांद्रेपर्यंत पोहोचतात. पण त्यानंतर स्टेशनपासून कार्यालयांपर्यंत पोहोचताना त्यांची खरी कसरत सुरू होते. खासगी वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वाहतुकीवरील ताण वाढतो. त्यामुळे हा उपक्रम हाती घेतला असला तरी कोंडीची समस्या सुटेल का हा प्रश्न कायम राहतो. त्यासाठी बीकेसीमध्ये 'पॉड टॅक्सी' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**प्रवाशांचे दररोज हाल**

वांद्रे आणि कुर्ला रेल्वे स्थानकावरून लोकल प्रवासी रिक्षाने कार्यालयांपर्यंत पोहोचतात. रिक्षा पकडण्यासाठी पहिलं त्यांना लाबंच-लांब रांगा लावाव्या लागतात. त्यानंतर रिक्षावाल्यांसोबत भाड्यासाठी रोजची भांडणं. हे सर्व करून एकदा रिक्षा मिळाली तरी नंतर ट्राफिकमध्ये तासभर वाया घालवायचा. बीकेसीतील कर्मचाऱ्यांचं हेच आयुष्य. याच समस्येवर उपाय काढण्यासाठी पॉड टॅक्सीचा पर्याय निवडला आहे. पण या पॉड टॅक्सीने खरचं मुंबईकरांना फायदा होईल का सवाल उपस्थित केला जात आहे

# तीन महिन्यांत गॅस 89 रुपयांनी महाग

प्रतिनिधी ८ जून



**मुंबई :** घरगुती वापराचा गॅस सिलिंडर पुन्हा महागला आहे. केंद्र सरकारने 'एलपीजी'च्या दरात २९ रुपयांची वाढ केली असून, ती रविवारपासून लागू करण्यात आली. गेल्या तीन महिन्यांतील ही दुसरी दरवाढ असून, या कालावधीत सिलिंडरची किंमत एकूण ८९ रुपयांनी वाढली आहे.

पश्चिम आशियातील भूराजकीय तणाव आणि होर्मुझ सामुद्रधुनीत सुरू असलेल्या कोंडीमुळे जागतिक स्तरावर स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर देशात घरगुती वापराच्या १४.२ किलो वजनाच्या सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ करण्यात आली. त्यानुसार आता सिलिंडरचा दर ९४२ रुपये असेल. मात्र, उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिसिलिंडर ३०० रुपयांचे अनुदान मिळत राहणार असल्याने त्यांना हे सिलिंडर ६४२ रुपयांना मिळणार आहे. परंतु हे अनुदान आता पहिल्या चार सिलिंडपर्यंतच मर्यादित आहे. या वाढीचा परिणाम आगामी काळात इतर आवश्यक वस्तूंच्या किंमतींवरही होऊ शकतो. या आधी ७ मार्चला स्वयंपाकाच्या गॅसचे दर ६० रुपये प्रतिसिलिंडर वाढवण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या किमतींमध्ये ४६ टक्क्यांची प्रचंड वाढ झाली.

◆इराण-अमेरिका बदल होत असून, सर्वच देशांमध्ये दरवाढ होत आहे. भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परिस्थिती उत्तमपणे हाताळली असून, कमीतकमी झळ बसेल, या दृष्टीने पावले उचलली आहेत.

- **देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

◆इंधन, एलपीजी दरात वारंवार वाढ होत असल्याने सामान्य नागरिकांना मोठा भुर्दंड बसत आहे. महागाईमुळे देशभरातील नागरिक हैराण झाले आहेत. त्याची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना मोजावी लागेल.

**शरद पवार**, अध्यक्ष, राष्ट्रवादी

# कार 20 फूट खाली कोसळली ; माय–लेकीचा जागीच मृत्यू, 5 गंभीर

प्रतिनिधी ८ जून

**मुंबई :** भीषण अपघातामध्ये कारमधील महिलेसह तिच्या अवघ्या ८ वर्षांच्या चिमुकल्या मुलीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

समृद्धी महामार्गावर अत्यंत थरारक आणि भीषण अपघात घडला आहे. मुंबईहून अमरावतीकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या कारचा टायर अचानक फुटल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. नियंत्रण सुटलेली ही कार महामार्गाचा सुरक्षा कठडा तोडून थेट २० फूट खाली ओढ्यावरील पुलाखाली कोसळली. या भीषण अपघातात कारमधील महिला आणि तिच्या अवघ्या ८ वर्षांच्या चिमुरड्या मुलीचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला, तर एकाच कुटुंबातील इतर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.



रविवार ७ जून लासूर स्टेशननजीक असलेल्या डोणगाव परिसरात हा अपघात घडला. कारचा चक्काचूर झाला असून या अपघाताने महामार्गावर खळबळ उडाली होती. हुमेरा मोहसिन शेख वय ३१, रा. कल्याण आणि हरिम जुनेद अहमद वय ८, रा. ठाणे अशी मृत पावलेल्या माय-लेकीची नावे आहेत.

मुंबईहून समृद्धी महामार्गाने गावी निघाले, पण कार पुलावरून थेट २० फूट खाली कोसळली.

या अपघाताप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईहून एक कुटुंब कारने (श्प०४ इइ ५८४०) अमरावतीच्या दिशेने समृद्धी महामार्गावरून निघाले होते. रविवारी कार डोणगाव परिसरातील एका ओढ्यावरील पूल चॅनल क्र. ४९६ जवळ आली. याच दरम्यान भरधाव कारचे एक टायर अचानक मोठ्या आवाजासह फुटले. टायर फुटल्याने चालकाला कारवर नियंत्रण ठेवता आले नाही. कार थेट महामार्गाची सुरक्षा भिंत (कठडा) तोडून थेट २० फूट खोल नाल्यात कोसळली. अपघाताचा आवाज इतका मोठा होता की, परिसरातील ग्रामस्थांनी तातडीने मदतीसाठी घटनास्थळाकडे धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक गणेश काळे आपल्या पथकासह तातडीने पोहोचले. पोलिसांनी स्थानिक नागरिक आणि महामार्ग कर्मचाऱ्यांच्या मदतीने कारमधील जखमींना बाहेर काढले. या दुर्घटनेत खालील ५ जण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील 'घाटी' रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच डॉक्टरांनी हुमेरा शेख आणि हरिम अहमद यांना मृत घोषित केले. शिल्लेगाव पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# मुंबई–पुणेकरांना मिळणार दिलासा ; मोसमी वारे शहरात येण्याची शक्यता

प्रतिनिधी ८ जून

**मुंबई :** मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये नऊ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र, त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर; तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार, किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खान्देश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही. दरम्यान, किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खान्देशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कृषी व आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून शेतकरी व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. त्यानुसार आगामी वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये, विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली; तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबणे टाळावे, असे आवाहन कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना करण्यात करण्यात आले आहे.

## मोसमी वारे आज पुण्यात येणार?

नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांचा वेग किंचित मंदावल्याने गेल्या २४ तासांपासून ते तळकोकणात मुक्कामी आहेत. सोमवारी पुणे, तर मंगळवारी मुंबईत हे वारे येण्याची शक्यता आहे. हे वारे संपूर्ण राज्य व्यापण्यासाठी जूनचा दुसरा आठवडा उजाडणार आहे. त्यामुळे मोठा पाऊस पुढील आठवड्यानंतरच राज्यात दिसेल, असा अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तवला. पुढच्या तीन-चार दिवसांत राज्याच्या अंतर्गत भागांत तुरळक ठिकाणी, तर किनारी भागांत अनेक ठिकाणी पावसामध्ये हळूहळू वाढ होत जाईल. आठ ते दहा तारखेदरम्यान किनारी भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. विदर्भ आणि उत्तर, मध्य महाराष्ट्र; तसेच मराठवाड्याच्या काही भागात पारा चाळीस अंशांवरच राहण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवस राज्यात रात्री किमान तापमान २६ ते ३२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. पालघर जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामानाचा पुढील दोन दिवस 'यलो अलर्ट' दिला आहे. सोमवारी रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि साताऱ्यात मध्यम ते जास्त पावसाचा 'यलो अलर्ट', तर रायगड, पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड आणि विदर्भातील बहुतांश भागांत सोसाट्याचा वारा वाहून विजांच्या कडकडाटासह तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा 'यलो अलर्ट' इशारा देण्यात आला आहे.

# मुंबईतील 835 बांधकामे बंद, 977 साईट्सना कारणे दाखवा !

प्रतिनिधी ८ जून

**मुंबई :** धूळ प्रदूषण रोखण्यासाठी मुंबई महापालिकेने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. या अंतर्गत जानेवारी ते जून या कालावधीत ८३५ बांधकामांना कामबंदीच्या नोटिसा बजावण्यात आल्या असून, ९७७ बांधकामांना कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या आहेत.

मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावल्यानंतर ऑक्टोबर २०२३मध्ये महापालिकेने परिपत्रक जारी करून बांधकामस्थळी प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांची अंमलबजावणी सक्तीची केली होती. मात्र, धूळ प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात अपयश आल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने महापालिकेवर ताशेरे ओढत कारवाई अधिक कठोर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर महापालिकेने तपासणी आणि अंमलबजावणी मोहीम अधिक तीव्र केली. बांधकाम आणि विकासकामांच्या ठिकाणी निर्धारित २८ मार्गदर्शक तत्त्वांचे पालन होत नसल्यास संबंधितांना कारणे दाखवा नोटीस, तसेच कामबंदीची नोटीस बजावली जात आहे. या नियमांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी महापालिकेच्या २४ प्रशासकीय विभागांमध्ये ९६ तपासणी पथके कार्यरत आहेत. मात्र, अनेक बांधकामस्थळी अद्यापही नियमांचे उल्लंघन होत असल्याचे तपासणीतून समोर आले आहे. महापालिकेच्या पर्यावरण व हवामान बदल विभागाने

## ♦ धूळ प्रदूषण नियंत्रण नियमावलीकडे दुर्लक्ष भोवले



तसेच वॉर्डस्तरीय प्रशासनाने मिळून मुंबईतील ३,०९३ बांधकामस्थळांची तपासणी केली आहे. या तपासणीत धूळ नियंत्रणाच्या उपाययोजनांबाबत अनेक त्रुटी आढळून आल्या. त्यानंतर संबंधित प्रकल्पांविरुद्ध कारवाई करण्यात आली. धूळ प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विकासक आणि कंत्राटदारांवर एक लाख रुपयांचा दंड आकारण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने गेल्या वर्षी जाहीर केला होता. मात्र, या दंडात्मक कारवाईची अंमलबजावणी अद्याप रखडली आहे. महापालिका कायद्यात एक लाख रुपयांच्या दंडाची स्पष्ट तरतूद नसल्याने त्यासाठी राज्य सरकारची मंजुरी आवश्यक आहे. संबंधित कायदेशीर तरतुदींची पूर्तता न झाल्यामुळे हा प्रस्ताव अद्याप अंमलात आलेला नाही. तसेच यासंदर्भातील प्रस्तावही राज्य सरकारकडे अद्याप पाविण्यात आलेला नसल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

# ठाण्यातून गायब झालेली मुलगी अखेर सापडली

प्रतिनिधी ८ जून

**ठाणे:** दिव्यातून बेपत्ता झालेल्या सात वर्षीय चिमुकलीचा ठाणे पोलिसांनी तब्बल ९४८ सीसीटीव्ही फुटेजचा शोध घेत सुखरूप सुटका केली. तब्बल ६०हून अधिक पोलिस अधिकारी व कर्मचारी, पोलिस मित्र आणि दिवा शहरातील नागरिकांच्या मदतीने ही शोधमोहीम राबवण्यात आली.

दिव्यात कुटुंबियांसह राहणाऱ्या मुलीचे वडील पाच महिन्यांपूर्वी उत्तर प्रदेशमधून याठिकाणी आले होते. ते भिवंडीत रांगोळीच्या कारखान्यात काम करतात. मुलगी २८ मे रोजी रात्री ८.३० वाजता खाऊ आणण्यासाठी घराबाहेर पडली. त्यानंतर परतली नाही. तिचा शोध न लागल्याने वडिलांनी मुंब्रा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल झाला. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून सहायक पोलिस आयुक्त प्रिया डमाळे आणि मुंब्रा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल शिंदे यांनी तपासाला गती दिली. दिव्यातील विविध इमारती, आजूबाजूचा परिसर पोलिसांच्या पथकाने पिंजून काढला. त्यावेळी एका इमारतीच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये मुलगी दिवा आगासन मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या दिशेने जाताना दिसली. त्यानंतर ती दिवा स्थानकातील फलाट क्रमांक एकवरून २८ मे रोजी रात्री १०.५७ वाजताच्या अंबरनाथ लोकलमध्ये प्रवेश करताना दिसली. पोलिसांच्या पथकाने कोपर, डोंबिवली, ठाकुर्ली, कल्याण, विठ्ठलवाडी, उल्हासनगर, अंबरनाथ या रेल्वे स्थानकांत त्यांची पथके पाचारण केली. त्यानंतर एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये रात्री १२ वाजता मुलगी एका अनोळखी व्यक्तीसोबत अंबरनाथ स्थानकात उतरताना दिसली. त्यानंतर दोघे बदलापूर लोकलमध्ये चढले आणि मध्यरात्री बदलापूर स्थानकात उतरताना दिसले होते. त्यानंतर पोलिसांनी तिचा माग काढला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135